DAY — **16** SEAT NUMBER | | | | | | |

2025	III	04	1500	**J-383**	(M)

POWER-DISTRIBUTION LINEMAN (F8)

Time : 3 Hrs. **(4 Pages)** **Max. Marks : 80**

सूचना : *(१) सर्व प्रश्न सोडविणे अनिवार्य आहे.*

(२) योग्य ठिकाणी सुबक नामनिर्देशित आकृत्या काढा.

(३) उजवीकडील अंक प्रश्नांचे पूर्ण गुण दर्शवितात.

(४) प्रत्येक प्रश्नाच्या उत्तराचा प्रारंभ नवीन पानावर करावा.

प्र. १. **(अ)** खाली दिलेल्या पर्यायांमधून योग्य पर्याय निवडून वाक्ये पुन्हा लिहा : (५) **[२०]**

(१) भारतातील सिंगल फेज सिस्टममध्ये वितरण ट्रान्सफॉर्मरची आउटपुट व्होल्टेज ----- आहे.

(अ) २३० व्होल्ट (ब) ५३० व्होल्ट

(क) २४ व्होल्ट

(२) ----- तुम्हाला सतत पुढे जाण्यास प्रवृत्त करते.

(अ) प्रोत्साहन (ब) अविश्वास

(क) उदासीनता

(३) शेतातून जाणाऱ्या एल. टी. लाइनसाठी प्रामुख्याने संरक्षित आवरण म्हणून ----- वापरले जाते.

(अ) पी. व्ही. सी. (ब) काच

(क) लाकूड

(४) स्प्रेडशीटमध्ये अक्षरे ----- ने दर्शविली जातात.

(अ) सेल (ब) ब्लॉक्स

(क) स्तंभ (कॉलम)

(५) ----- हे सक्रिय श्रवणाच्या प्रक्रियेचा पहिला टप्पा आहे.

(अ) न बोलणे (ब) ग्रहण करणे

(क) अर्थ लावणे

(ब) खालील गटांच्या योग्य जोड्या जुळवा : (५)

'अ' गट	'ब' गट
(अ) चार्ट्स	(१) हृदयाची तपासणी
(ब) विद्युत दाब	(२) जंप वायरची जोडणी
(क) पी. जी. (P.G.) क्लॅम्प	(३) माहितीचे ग्राफिकल संकलन
(ड) स्लिव्ह जॉईंट	(४) व्होल्ट
(इ) ई.सी.जी.	(५) ॲल्युमिनियम वाहक

(क) खालील विधाने 'बरोबर' आहेत की 'चूक' ते लिहा : (५)

(१) ज्या सामग्रीमधून विद्युत प्रवाह उच्च प्रतिरोधाने वाहतो त्याला दुर्वाहक म्हणतात.

(२) श्रवणाच्या मूल्यमापन अवस्थे दरम्यान दुसरी व्यक्ती बोलत असताना तुम्ही त्यांचे मूल्यमापन केले पाहिजे.

(३) घटकाचा सर्वात लहान कण रेणू म्हणून ओळखला जातो.

(४) कामाच्या ठिकाणी आपल्याला आपात्काल धोक्याचा बोर्ड लावणे आवश्यक आहे.

(५) क्लास-सी अग्निशामक यंत्र फक्त विद्युत उपकरणांच्या आगीवर वापरण्यासाठी योग्य आहेत.

(ड) खालील प्रश्नांची प्रत्येकी केवल 'एका' वाक्यात उत्तरे लिहा : (५)

(१) कंम्प्यूटर स्प्रेडशिटमध्ये ज्या सेलला जाड बॉर्डरने हायलाईट केलेले असते त्या सेलला काय म्हणतात?

(२) प्रेरणा म्हणजे काय?

(३) स्लाइड शो थांबवण्यासाठी कोणती शॉर्टकट की वापरली जाते?

(४) बाइंडिंग वायरचा उपयोग कसा केला जातो?

(५) CPRचा पूर्ण अर्थ लिहा.

प्र. २. खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा (कोणतेही चार) : **[१२]**

(१) 'सक्रिय श्रवणाची प्रक्रिया समजून घेणे' यावर टीप लिहा.

(२) उद्योजकाच्या कौशल्यांची यादी करा.

(३) पर्यावरणीय पर्यटन क्षेत्रात असणाऱ्या हरित (green) नोकऱ्यांची यादी लिहा.

(४) कंडक्टरला होणाऱ्या नुकसानाची कारणे लिहा.

(५) विद्युत सुरक्षा नियमांचा उद्देश काय आहे?

(६) विद्युत उपकरणांच्या देखभालीसाठी सामान्य मार्गदर्शक तत्त्वे काय आहेत?

प्र. ३. खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा (कोणतेही चार) : **[१२]**

(१) वाक्यांचे प्रकार लिहा.

(२) व्यक्तिमत्त्वाचा अर्थ सांगा.

(३) जोखीम व्यवस्थापनाची कौशल्ये आत्मसात करण्यासाठी उद्योजकाने कोणत्या सामान्य पद्धतीचा अवलंब केला पाहिजे?

(४) वितरण लाइनमॅनची कर्तव्ये आणि जबाबदाऱ्या काय आहेत?

(५) मूलभूत विद्युत सुरक्षिततेसाठी चेकलिस्ट तयार करा.

(६) फायर ड्रीलचे (सरावाचे) नियोजन करण्याच्या पायऱ्या लिहा.

प्र. ४. खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा (कोणतेही तीन) : **[१२]**

(१) व्यक्तिमत्त्वाच्या मूलभूत गुणांची यादी करा.

(२) सक्रिय घटकांची यादी करा.

(३) गाय स्ट्रेन टाइप इन्सुलेटर्सबद्दल लिहा.

(४) विद्युत शॉक टाळण्यासाठी तुम्ही कशी मदत करू शकता?

(५) विद्युत घटकांची योग्य हाताळणी करण्याची गरज का आहे?

प्र. ५. खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा (कोणतेही तीन) : **[१२]**

(१) इंडक्टरबद्दल माहिती लिहा.

(२) प्रथमोपचार म्हणजे काय?

(३) सुरक्षा हेल्मेटचे कार्य लिहा.

(४) इलेक्ट्रिकल कामाच्या ठिकाणी पाळले जाणारे सुरक्षा नियम लिहा.

(५) तुम्ही विद्युत सुरक्षा कशी राखता ते लिहा.

प्र. ६. (अ) खालील प्रश्नांची उत्तरे सविस्तार लिहा (कोणतेही एक) : (६) **[१२]**

(१) एसी वितरण प्रणालीचे प्रकार सांगा.

(२) ट्रान्सफॉर्मरच्या आकृती (रेखांकन) आणि गणन शीटवर कोणते तपशील नमूद केलेले असतात?

(ब) खालील प्रश्नांची उत्तरे सविस्तार लिहा (कोणतेही एक) : (६)

(१) कामाच्या ठिकाणी आरोग्य आणि सुरक्षिततेसंबंधी कोणकोणते प्रश्न आहेत?

(२) सीरिज सर्किटची आकृती काढा.

◆◆◆